महाराष्ट्र शासन

क्रमांक : सीबीसी १०९५ / प्र.क्र. २२६ / इमाव -५
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ ऑक्टोबर, १९९५

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हादंडाधिकारी,

विषय : <u>मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी</u>
जाती प्रमाणपत्र देण्याबाबतच्या अडचणी

जातीचे प्रमाणपत्र देतांना कोणत्या गोष्टी विचारात घ्यावयाच्या याची यादी शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. सीबीसी - १०९७ / ५०८७३ / डी.-५, दिनांक २१.३. ७९ सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमुद केलेल्या आहेत. दि. ९.८.९५ च्या शासन निर्णयान्वये काही मुस्लीम जातींचा समावेश इतर मागास वर्गात केलेला आहे. या जातीच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र देतांना मागसलेल्या जातीचा दावा करणा-या व्यक्तींच्या सर्व साधारण रहिवास सध्या रहात आलेल्या ठिकाणी त्यांच्या जाती बाबत गृह चौकशी करावी तसेच तेथील तलाठी / सरपंच यांनी दिलेल्या जाती दाखल्याच्या तसेच प्रतिज्ञापत्राच्या आधारे तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी जाती दाव्याबाबत निर्णय घेऊन त्यांनी खात्री पटल्यास संबंधित व्यक्तींना जाती प्रमाणपत्र देण्यात यावे. सोबत काही मुस्लीम जातींची माहिती जोडली आहे. तीही विचारात घ्यावी हे सर्व विचारात घेऊन जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. सदरहू सूचना मुस्लीम जातींच्या व्यक्तींना द्याव्याच्या जाती प्रमाणपत्राच्या संदर्भातच आहे,

२. सदरच्या सुचना सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्या त्यांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत.

सही /-
( स. नु. गावीत )
कक्ष अधिकारी

शासन पत्र समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र. सीबीसी १०९५ / प्र.क्र. २३६ / मावक - ५, दिनांक १९.१०.९५ चे सहपत्र

<u>मुस्लीम जातींची माहिती</u>

१) <u>बागवान</u> :- बागवान याचा अर्थ माळी व्यवसाचे करणारे मुस्लीम धार्मिक व्यक्ती आहेत. या व्यक्तींच्या व्यक्तींना जात प्रमाणपत्र देताना त्यांचे पूर्वज माळी व्यवसाय करीत होते काय, याबाबत माहिती घ्यावी.

२) <u>जुलाह ( मोमीन )</u> :- म्हणजे विणकर ( कापड विणखारे ) मुस्लीम धर्मिय आहेत. जुलाहाच्या तत्सम जाती म्हणून कोळी, जुलाह, चर्चा जुलाह, मोची जुलाह, रामदासी जुलाह आहेत. त्यांचे विवाह मुस्लीम धर्मियाप्रमाणेच होतात. त्यांच्यात बुरखा पध्दत प्रचलित नाही.

३) <u>अन्सारी</u> :- ही जात देखील जुलाह मोमिन जाती प्रमाणेच विणकर व्यवसाय करणारी आहेत.

४) <u>पिंजार, पिंजारी, मन्सुरी, नदाफ</u> :- या जाती इस्लाम धर्मीय मुस्लीम समाजातील कापूस पिंजणारी, गाधा, बनविणारी तसेच कारखान्यातून काम करणारी व खेडयापाडयातून कष्टकती करणारी व्यवसासियक जमात आहे.

५) <u>फकीर बंदरवाले ( माकडवाले )</u> :- माकडाचे खेळ दाखवून स्वतःचा उदरनिर्वाह करणा-या लोकांना फकीर बंदरवाले ( माकडवाले ) म्हणून ओळखतात.

६) <u>तांबोळी</u> :- विडयाच्या पानांची विक्री करुन स्वतःचा उदरनिर्वाह करतात.

७) <u>अत्तार</u> :- हळद, कंकू, मेंदी इत्यादी विक्रीचा व्यवसाय करणा-या लोकांना अत्तार म्हणतात.